# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०८.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०७/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४५७ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ३,४०,६००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.०७/१२/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन एकुण ६,१६०/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि.०७/१२/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे हटटा येथे ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ६००/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैध रेती वाहतुक करणाऱ्या विरूध्द गुन्हा नोंद :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध रेती वाहतुक करणाऱ्या विरूध्द दिनांक ०७/१२/२०२२ रोजी पोस्टे हटटा, गोरेगाव व पोस्टे कळमनुरी येथे प्रत्येकी ०१ अशा एकुण ०३ ठिकाणी कलम ३७९ भादवी सह कलम ४८(७)(८) गौण खनीज अधी.प्रमाणे गुन्हा दाखल होवुन आरोपीस ताब्यात घेतले असुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**ई सी ॲक्ट सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. ०७/१२/२०२२ रोजी फिर्यादी गजानन अर्जुनराव बोराटे वय ३५ वर्ष व्य.नौकरी सपोनि ने. पोस्टे हटटा यांचे फिर्यादी वरून पोस्टे हटटा येथे ३२८,२७२,२७३,१८८ भादवी व सहकलम 26(2)(i),26(2)(iv),27(2)(e),30(2)(अ)59 अन्नसुरक्षा.अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन यातील आरोपीने महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेल्या सुंगधी तंबाखुजन्य पदार्थ पानमसाला गुटखा स्वता:चे फायद्यासाठी बेकायदेशीर रित्या विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगत असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल असुन आरोपीकडुन एकुन ४२,४००/— रू चा मुदेमाल जप्त करण्यात आला आहे व पुढील तपास हटटा पोलीस करित आहेत.

**तडीपार आदेशाचे उल्लघंन करणाऱ्या विरूध्द विशेष कार्यवाही:—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामधुन तडीपार केलेल्या इसमांनी तडीपारीचे आदेशाचे उल्लघन केल्याचे दिनांक ०७/१२/२०२२ रोजी पोस्टे हिंगोली शहर येथे ०२ इसमांविरूध्द कलम १४२ महाराष्ट्र पोलीस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला.